तरुण भारत



कोल्हापूर : अस्मिता मारुलकर यांच्या स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाच्या कोनशिलेचे अनावरण रजनी व पंडित मारुलकर यांच्या हस्ते झाले. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी.

# अस्मिताच्या स्मरणार्थ संशोधक विद्यार्थीनी वसतिगृहाचे भूमीपूजन

प्रतिनिधी

कोल्हापूर

मारूलकर दांपत्यांनी आपली दिव्यांग मुलगी अस्मितासाठी साठवलेल्या ३५ लाख रुपयांची देणगी तिच्या अकाली निधनानंतर शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द केली. मारुलकर दांपत्याच्या दातृत्वाचा सन्मान करीत शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या हस्ते अस्मिता मारुलकर यांच्या स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या विद्यापीठ हीरकमहोत्सवी संशोधक विद्यार्थिनींसाठीच्या वसतिगृहाचे भूमिपूजन केले.

अस्मिता मारुलकर या आपल्या दिव्यांग मुलीच्या भवितव्याची तरतूद म्हणून रजनी व पंडित मारुलकर या दांपत्याने ३५ लाख रुपयांची बचत केली होती. निधीमधून संशोधक विद्यार्थिनींसाठी वसतिगृह उभा करून, कोनशिलेवर अस्मिता मारुलकर यांच्या स्मरणार्थ असा उल्लेख केला जाईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृहाशेजारीच या संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाचे भूमिपूजन केले. पंडित मारूलकर व रजनी मारुलकर या दांपत्याच्या हस्ते कोनशिला अनावरण केले. त्यांनी भूमीपूजनाला स्वतःच्या बागेतील फुले वाहीली. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अजित चौगुले यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

31 AUG 2022 लोकमत

# परीक्षांबाबत अफवा पसरविणाऱ्यांवर कारवाई

## पोलीस अधीक्षकांचे निर्देश : शिवाजी विद्यापीठ परीक्षा मंडळ संचालकांचे निवेदन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांबाबत समाजमाध्यमांद्वारे चुकीची माहिती तसेच अफवा पसरविणाऱ्या प्रवृत्तींविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. शैलेश बलकवडे यांनी मंगळवारी येथे दिले.

काही अज्ञात समाजकंटकांनी विद्यापीठाच्या वेबसाइटवरील परिपत्रकात फेरफार करून दि. २३ ऑगस्ट रोजीचा फिजिकल केमिस्ट्रीचा पेपर रद्द केल्याचे समाजमाध्यमांद्वारे व्हायरल केले. यामुळे परीक्षार्थींसह महाविद्यालये, प्राचार्य आदी घटकांत मोठा संभ्रम निर्माण झाला. तो दूर करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाला ऐन परीक्षेच्या कालखंडात धावपळ करावी लागली. परीक्षाविषयक गंभीर, गोपनीय आणि अतिमहत्त्वाच्या कामाविषयी समाजात चुकीचा संदेश जाण्याबरोबरच विद्यापीठाचे बोधचिन्ह आणि लेटरहेड यांचाही गैरवापर केल्याचे आढळून आले. याप्रकरणी पोलीस प्रशासनाने अद्ययावत सायबर सेलमार्फत चौकशी करून समाजातील या विकृत मनोवृत्तीला आळा घालण्याच्या उद्देशाने दोषी व्यक्तींना शोधून काढून त्यांच्यावर कडक कारवाई करावी, या मागणीचे निवेदन विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आणि उपकुलसचिव निवास माने यांनी डॉ. बलकवडे यांना दिले. त्यावर शैक्षणिक क्षेत्रासह विद्यापीठाच्या लौकिकाला बाधा आणणाऱ्या या गंभीर प्रकाराची पोलीस प्रशासनामार्फत सखोल चौकशी करण्यात येईल. अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही डॉ. बलकवडे यांनी दिली. संबंधिताना या संदर्भातील कारवाई तातडीने करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

31 AUG 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परीक्षांबाबत अफवा पसरविणाऱ्यांवर कारवाई करा

## पोलिस अधीक्षक बलकवडे यांचे निर्देश



**कोल्हापूर : जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. शैलेश बलकवडे यांना निवेदन सादर करताना शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव व उपकुलसचिव निवास माने.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांबाबत समाजमाध्यमांद्वारे चुकीची माहिती व अफवा पसरविणाऱ्या प्रवृत्तींविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. शैलेश बलकवडे यांनी दिले.

शिवाजीविद्यापीठाच्यासध्यासुरू असलेल्या परीक्षेच्या अनुषंगाने काही अज्ञात समाजकंटकांनी विद्यापीठाच्या वेबसाईटवरील परिपत्रकात फेरफार करून २३ ऑगस्ट रोजीचा एम. एस्सी.चा फिजिकल केमिस्ट्रीचा पेपर रद्द केल्याचे समाज माध्यमांद्वारे व्हायरल केले. एका वृत्तपत्रातील बातमी अशाच प्रकारे फेरफार करून समाजमाध्यमातून व्हायरल केली. यामुळे परीक्षार्थींसह महाविद्यालये, प्राचार्य आदी घटकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला. तो दूर करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनास ऐन परीक्षेच्या काळात धावपळ करावी लागली.

शिवाजी विद्यापीठासारख्या नामांकित शैक्षणिक संस्थेच्या परीक्षाविषयक गंभीर, गोपनीय व अति महत्त्वाच्या कामाविषयी समाजात चुकीचा संदेश जाण्याबरोबरच विद्यापीठाचे बोधचिन्ह व लेडरहेड यांचा गैरवापर केल्याचे आढळून आले. याप्रकरणी पोलिस प्रशासनाने अद्ययावत सायबर सेलमार्फत चौकशी करून समाजातील या विकृत मनोवृत्तीला आळा घालण्याच्या उद्देशाने दोषी व्यक्तींना शोधून काढून त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी करणारे निवेदन मंगळवारी शिवाजी विद्यापीठातर्फे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. बलकवडे यांना प्रत्यक्ष भेटून दिले. त्यांच्यासमवेत परीक्षा विभागाचे उपकुलसचिव निवास माने होते. शैक्षणिक क्षेत्रासह शिवाजी विद्यापीठाच्या लौकिकास बाधा आणणाऱ्या गंभीर प्रकाराची पोलिस प्रशासनामार्फत सखोल चौकशी करण्यात येईल. समाजविघातक प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही डॉ. बलकवडे यांनी दिली. संबंधितांना या संदर्भातील तातडीने कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

31 AUG 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञानाच्या विश्वात

डॉ. व्ही.एन. शिंदे

# चला नारळ लावू या!

झाड. मानवच नव्हे तर सर्व सजीवांसाठी महत्त्वाचा घटक. झाडे अनेक प्रकारची आहेत. मानवासाठी 'व्यक्ती तितक्या प्रकृती आणि प्रवृत्ती' असतात. झाडांचेही असेच आहे. काही झाडांची फुले सुंदर असतात, तर काही फळांमुळे. काहींचे लाकूड चांगले टिकाऊ असते, तर काहींचे अगदीच ठिसूळ. काही झाडांची पाने प्राणी खातात, तर काहींकडे ढुंकूनही पहात नाहीत. विशिष्ट ठिकाणी रूजणारी, फुलणारी काही झाडे दुसरीकडे जगत नाहीत, तर काही झाडे एका भागातून दुसऱ्या भागात गेल्यावर तिथल्या मूळ झाडांचे जगणे कठीण करून टाकतात. झाडांच्या विविध घटकांपासून मानवाला पूर्णान्न प्राप्त होते. जगण्यासाठी आवश्यक असणारे सर्व घटक पुरवण्याची क्षमता झाडांमध्ये आहे. झाडांचे उपयोग आणि फायदे सध्या सर्वत्र सांगितले जातात, ऐकायला मिळतात. झाडे कमी झाली आहेत म्हणून जगभर ओरड सुरू आहे. तसेच त्यांचे प्रमाण वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न होत आहेत.

तरीही एखाद्या झाडांसाठी जागतिक पातळीवर दिन साजरा करण्याचे भाग्य एखाद्याच झाडाला लाभते. नारळाच्या झाडाला हे भाग्य लाभले आहे. नारळाचा प्रत्येक भाग उपयोगाला येतो. चंदनाच्या लाकडाला सुगंध असला तरी त्याची पाने आणि फुले खाण्यासाठी वापरली जात नाहीत. सागवानाचे लाकूड टिकाऊ असले तरी त्याच्या विस्तीर्ण पानावर कोणी जेवू शकत नाही. मात्र, नारळाच्या झाडांचे असे नाही. भारतात तर नारळाच्या झाडाला 'कल्पवृक्ष' म्हणतात. तसे तर प्रत्येक झाडच कल्पवृक्ष ठरते. अन्न, हवा, पाणी, सावली, वस्त्रे अशा जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत आणि पूरक गरजांची पूर्तता झाडेच करतात. मात्र, त्याच्या उपयुक्ततेमुळे असा वेगळा दिन वाटणीला येण्याचे भाग्य नारळाला लाभले आहे. 'जागतिक नारळ दिन' २ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात येतो.

२००९ पासून आंतरराष्ट्रीय पातळीवर 'नारळ दिन' साजरा करण्यास सुरुवात केली. जागतिक पातळीवर नारळ शेतीबाबत जागरूकता निर्माण करणे, नारळ शेतीचे क्षेत्र वाढवणे हा प्रामुख्याने यामागे उद्देश आहे. इंडोनेशिया छोटा देश असूनही नारळाच्या उत्पादनामध्ये त्याचा प्रथम क्रमांक लागतो. भारतात कोकण, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू आणि पूर्व भागात नारळाची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात येते. दरवर्षी नारळाच्या फायद्यांना लक्षात घेऊन एक संकल्पना देण्यात येते. यावर्षी 'शाश्वत विकासासाठी नारळ' ही संकल्पना निश्चित झाली आहे. युनोनेदेखील २०२२ वर्षासाठीची संकल्पना 'शाश्वत विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान' निश्चित केली आहे. या पार्श्वभूमीवर नारळ दिनाचे महत्व आणखी वाढते.

नारळाला येणारे पान संयुक्त पान झाल्यापासून ते मानवाच्या उपयोगाला पडते. संयुक्त पानातील पर्णिकांच्या शिरांना वेगळे काढून त्यापासून झाडू बनवले जातात. पर्णिकांचा उर्वरित भाग हा कुजून खत देतो, माती भुसभूशीत करतो. पुढे ते झाड वाळेपर्यंत सुरू राहते. झाडाचे खोड एकांडी शिलेदारासारखे वाढत जाते. झाड योग्य वाढल्यानंतर पानाच्या बेचक्यातून कळ्यांचे गुच्छ बाहेर पडतात. या कळ्यांवर खारूताई आणि उंदिर ताव मारायला टपलेले असतात. त्यांचा झाडावर वावर कमी व्हावा म्हणून झाडांच्या खोडावर ठराविक उंचीवर पत्रा मारण्यात येतो. परागीभवन झालेल्या फुलांतून नारळ तयार व्हायला लागतात. हिरव्या अपरिपक्व फळांमध्ये पाणी येत राहते, फळ मोठे होत राहते. या हिरव्या फळांतील पाणी आरोग्यासाठी सर्वोत्तम मानले जाते. यामध्ये सर्वाधिक पालाश आणि खनिजे असतात. सात महिन्यांच्या शहाळ्यात साखरेचे प्रमाण सर्वाधिक असते. या शहाळ्यात खोबरे तयार व्हायला सुरुवात होते. या मलईपासूनही अनेक पदार्थ बनवले जातात.

नारळाचे फळ पक्व होताना आतील करवंटीला चिकटलेले खोबरे जाडीने वाढू लागते. पाण्याचे प्रमाण कमी होते. फलधारणा झाल्यापासून फळ पक्व होण्यासाठी अकरा ते बारा महिन्याचा कालावधी लागतो. नारळाच्या झाडाला धार्मिक महत्त्वही देण्यात आले आहे. नारळाचे पीक सर्वत्र घेतले जात नसल्याने सर्व लोकांच्या आहारात नारळ यावा, या हेतूने कदाचित एवढे धार्मिक महत्त्व दिले असावे. ताज्या खोबऱ्यामध्ये ५० ते ५५ टक्के पाणी असते. ओल्या खोबऱ्यापासून दूध काढले जाते. डेअरी क्रीमला पर्याय म्हणून हे वापरले जाते. यामध्ये साखर आणि स्निग्धांश कमी असल्याने नारळांपासून बनवलेले पदार्थ शरीरासाठी चांगले असतात. नारळाच्या दुधापासून मलई बनवली जाते. करी, गोड पदार्थ आणि बेकरीजन्य पदार्थात याचा वापर होतो. पक्व नारळातील पाण्यात दोन टक्के साखर असते. ५.४ टक्के विद्राव्य घटक असतात. तसेच ०.५ टक्के खनिजे, ०.१ टक्का प्रोटीन आणि ०.१ टक्का स्निग्धांश असतात. नारळ फोडण्यापूर्वीच आतील सर्व पाणी संपले की, पुढे खोबरे पूर्ण वाळून गोटा खोबरे तयार होते. यामध्ये पाच ते सहा टक्के पाणी असते.

खोबऱ्यापासून खाण्यासाठीचे मिळणारे तेल हे सर्वोत्तम असते. मात्र, अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी या तेलाचे अनेक तोटे आहेत, असा प्रसार केल्याने खोबऱ्याचे तेल आहारात फारच कमी प्रमाणात वापरले जाते. खोबऱ्यापासून तेल काढल्यानंतर राहिलेली पेंड जनावरांसाठी पोषक आहार असते. भारतात दरवर्षी १७ लाख टन करवंटी उपलब्ध होते. त्यापासून शोभेच्या वस्तू, कोळसा आणि एक्टिव्हेटेड कोळसा बनवला जातो. एक्टिव्हेटेड कोळसा वनस्पती तेलाच्या शुद्धीकरण प्रकल्पात वापरला जातो. काथ्यापासून दोरखंड बनवतात. करवंटीची भुकटी लाकडाच्या फटीमध्ये बसवून त्या बुजवल्या जातात. अगरबत्तीतही वापरतात. काथ्यापासून दोरखंड निघतो. सर्वात महत्त्वाचे, नारळाचेही झाडच आहे आणि ते दिवसा ऑक्सिजन देते. नारळाचे मूळ आपल्याकडील आहे. तो सर्वत्र खाण्यासाठी वापरला जातो. तो सर्व भागात चांगले उत्पादन देतो. त्यामुळे नारळाची झाडे लावून यावर्षीचा 'जागतिक नारळ दिन' साजरा करूया!

संपर्क : ९६७३७८४४००
vilasshindevs44@gmail.com

पुण्यनगरी

# विद्यापीठ परीक्षांबाबत अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाईचे निर्देश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांबाबत समाजमाध्यमांद्वारे चुकीची माहिती, तसेच अफवा पसरवणाऱ्या प्रवृत्तीविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश कोल्हापूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. शैलेश बलकवडे यांनी दिले. विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन संचालक अजितसिंह जाधव यांनी पोलीस अधीक्षकांकडे भेटून याबाबत मंगळवारी मागणी केली होती.

शिवाजी विद्यापीठाच्या सध्या सुरू असलेल्या परीक्षांच्या अनुषंगाने काही अज्ञातांनी विद्यापीठाच्या वेबसाईटवरील परिपत्रकात फेरफार करून दि. २३ ऑगस्ट रोजीचा एम.एस्सी.चा फिजिकल केमिस्ट्रीचा पेपर रद्द केल्याचे समाजमाध्यमांद्वारे व्हायरल केले. यामुळे परीक्षार्थीसह महाविद्यालये, प्राचार्य आदी घटकांत मोठा संभ्रम निर्माण झाला. तो दूर करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाला ऐन परीक्षेच्या कालखंडात मोठी धावपळ करावी लागली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे बोधचिन्ह आणि लेडरहेड यांचाही गैरवापर केल्याचे आढळून आले. या प्रकरणाची चौकशी करून समाजातील या विकृत मनोवृत्तीला आळा घालण्याच्या उद्देशाने दोषी व्यक्तींना शोधून काढून त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी परीक्षा विभागाकडून करण्यात आली.

३१ AUG 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षेबाबत खोटी माहिती पसरविणाऱ्यांवर कारवाई करा

## शिवाजी विद्यापीठाची मागणी; पोलिस अधीक्षक बलकवडे यांना निवेदन

**कोल्हापूर, ता. ३०** : शिवाजी विद्यापीठ परीक्षांबाबत समाज माध्यमांद्वारे चुकीची माहिती तसेच अफवा पसरविणाऱ्या प्रवृत्तींविरोधात कडक कारवाई करा, अशी मागणी परीक्षा मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव यांनी केली. याबाबतचे निवेदन त्यांनी पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे यांना दिले. या प्रकरणी कारवाई करण्याचे निर्देश कोल्हापूरचे जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. शैलेश बलकवडे यांनी या वेळी दिले.

शिवाजी विद्यापीठाच्या सध्या सुरू असलेल्या परीक्षेच्या अनुषंगाने काही अज्ञात समाजकंटकांनी शिवाजी विद्यापीठाच्या वेबसाईटवरील परिपत्रकात फेरफार करून २३ ऑगस्टचा एम.एस्सी.चा फिजिकल केमिस्ट्रीचा पेपर रद्द केल्याचे समाजमाध्यमांद्वारे व्हायरल केले. तसेच, एका वृत्तपत्रातील बातमीही अशाच प्रकारे फेरफार करून समाजमाध्यमांतून व्हायरल केली. यामुळे परीक्षार्थींसह महाविद्यालये, प्राचार्य आदी घटकांत मोठा संभ्रम निर्माण झाला. तो दूर करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाला ऐन परीक्षेच्या कालखंडात मोठी धावपळ करावी लागली. शिवाजी विद्यापीठासारख्या नामांकित शैक्षणिक संस्थेच्या परीक्षाविषयक गंभीर, गोपनीय आणि अतिमहत्त्वाच्या कामाविषयी समाजात चुकीचा संदेश जाण्याबरोबरच विद्यापीठाचे बोधचिन्ह आणि लेटरहेड यांचाही गैरवापर केल्याचे आढळून आले. सदर प्रकरणी पोलिस प्रशासनाने अद्ययावत सायबर सेलमार्फत चौकशी करून विकृत मनोवृत्तीला आळा घालण्याच्या उद्देशाने दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी करणारे निवेदन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. बलकवडे यांना आज प्रत्यक्ष भेटून दिले. त्यांच्याबरोबर परीक्षा विभागाचे उपकुलसचिव निवास माने होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षेतील पेपरबद्दल गैरसमज पसरविणारे खोटे संदेश पाठविणाऱ्यांवर कारवाई करावी, याबाबतचे निवेदन पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे यांना देताना परीक्षा मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव आदी.**

तरुण भारत

# परिपत्रकात फेरफार करणाऱ्या अज्ञातावर गुन्हा दाखल करा

- डॉ. अजितसिंह जाधव यांचे पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांना निवेदन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सुरु असलेल्या उन्हाळी सत्रातील ऑफलाईन वस्तुनिष्ठ परीक्षा विविध केंद्रावर सुरू आहेत. फिजिकल केमेस्ट्री-२ २३ ऑगस्ट रोजी झाला होता. तो पेपर रद्दबादल केला असून तो २९ ऑगस्ट रोजी होणार असल्याचे बनावट परिपत्रक अज्ञाताने २६ ऑगस्ट रोजी समाज माध्यमांवर व्हायरल केले आहे. विद्यापीठाच्या परिपत्रकात छेडछाड करून चुकीची माहिती व्हायरल करणाऱ्या अज्ञातावर गुन्हा दाखल करावा, या मागणीचे निवेदन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांना दिले. यावेळी उपकुलसचिव निवास माने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे, शिवाजी विद्यापीठाचा लोगो वापरून बनावट परिपत्रक तयार करून पेपर रद्द केल्याची चुकीची माहिती व्हायरल केली आहे. त्यामुळे महाविद्यालय, विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम अज्ञाताने केले. त्यामुळे विद्यापीठाची बदनामी करणाऱ्या



अज्ञातावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे. यावर विद्यापीठाच्या परीक्षांबाबत समाजमाध्यमांद्वारे चुकीची माहिती पसरवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी दिले. या प्रकाराची पोलीस प्रशासनामार्फत सखोल चौकशी करण्यात येईल, अशा समाजविघातक प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही बलकवडे यांनी दिली.